# मुंबई विद्यापीठ

## कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ – कायदा – २०१३
## महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी विभागीय कार्यशाळा

कामाच्या ठिकाणी महिलांचा छळ याची दखल आजही गांभीर्याने घेतली जात नाही. औरंगाबाद येथील नुकतीच घडलेली घटना याचे गांभीर्य लक्षात आणून देते. मॅनेजमेंट स्टडिजचा अभ्यास करणा–या एका विद्यार्थीने एका युवकाच्या लैंगिक छळाला कंटाळून आणि कोणाकडूनही विशेष पाठिंबा आणि मदत न मिळाल्याने आत्महत्या केली. अषाच घटना वर्तमानपत्र आणि इतर माध्यमातून ऐकायला मिळतात. या संबंधी कायद्याबरोबरच समाजात विषेशत: शाळा आणि महाविद्यालयात शिक्षक, प्राचार्य, आणि महाविद्यालयातील कर्मचारी यांच्यात स्त्रियांवर होणा–या हिंसाचाराबाबत संवेदनशिलता निर्माण करणे, तसेच २०१३ चा कायदा आणि त्याची महाविद्यालयामध्ये योग्य त–हेने अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठ यांनी दोन दिवसांचे विभागीय कार्यषाळा आयोजित केल्या आहेत. पहिली कार्यशाळा २७ आणि २८ ऑगस्ट, २०१५ रोजी पोदार महाविद्यालय, माटुंगा येथे होणार असून त्याचे उद्‌घाटन मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू माननीय डॉ. संजय देशमुख करणार आहेत. दुसरी कार्यशाळा दक्षिण मुंबई महाविद्यालयांसाठी तारीख ३ आणि ४ सप्टेंबर, २०१५ ला अन्जुमन ईस्लाम महाविद्यालय, सी.एस.टी. स्टेशन येथे होणार असून तिसरी कार्यषाळा पश्चिम रेल्वे येथील महाविद्यालयांसाठी हिंदूजा महाविद्यालय, चर्नी रोड येथे ७ व ८ सप्टेंबर, २०१५ रोजी होणार आहे. या सर्व कार्यशाळांची वेळ सकाळी ९ ते सायंकाळी ४ अशी असणार आहे. या कार्यशाळांतून विद्यार्थी आणि युवकांमध्ये काम करणा–या नामवंत तज्ञांचे मार्गदर्शन होणार आहे. Ladli, Population First, Akshara, Vacha, HRLN, MAVA, आणि महिला विकास कक्ष यांचे अनुभवी तज्ञ चर्चा करणार आहेत. तसेच या संस्थांचे मार्गदर्शन करणारे वाड.मय विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहे, असे महिला विकास कक्ष, मुंबई विद्यापीठाच्या कार्याध्यक्षा, डॉ. क्रांती जेजुरकर कळवतात.

डॉ. (श्रीमती) क्रांती जेजुरकर,
कार्याध्यक्षा,
महिला विकास कक्ष,
मुंबई विद्यापीठ